# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर ,कोल्हापूर -४१६ ००४.

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board ,Rajendranagar,Kolhapur-416 004.

Phone s: Chairman 2690829[O] 2656044[R]Secrtary 2691405[O]2324079[R].PBX – 2696101,2696102,2696103 FAX :[0231] 2690758 E-Mail Divsec.kop@gmail.com


**अत्यंत महत्वाचे/परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 7195
कोल्हापूर ४१६ ००४.
दिनांक : २६.०२ .२०२१

प्रति,

जिल्हा क्रीडा अधिकारी,
सातारा, सांगली व कोल्हापूर

**विषय : एप्रिल-मे २०२१ माध्यमिक शालान्त (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या व जिल्हास्तर, विभागस्तर, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचे प्रस्ताव विभागीय मंडळास पाठविण्या बाबत.**

**संदर्भ :१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/ एस.डी.२ दि.२०/१२/१८**

**२) शासन शुध्दिपत्र क्र.उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२/ दि.२५/०१/२०१९**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या व जिल्हास्तर, विभागस्तर, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेले खेळाडू विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे क्रीडा गुण देण्याची कार्यवाही करण्यात येते.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेतील सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हयातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील एप्रिल-मे २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त (इ.१० वी) परीक्षेस व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या व जिल्हास्तर, विभागस्तर, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या व प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव **आपणाकडे उपरोक्त शासन निर्णायानुसार प्राप्त होतील सदर प्रस्ताव हे योग्य त्या शिफारशीसह गुणानुक्रमे ( ०५, १०, १५, २० व २५ गुण ) अशी यादी तयार करुन सादर करावेत.**

संदर्भिय क्र.०१ च्या शासन निर्णयास अनुलक्षून संदर्भिय क्र.०२ च्या शासन शुध्दिपत्रातील **सुधारीत परिशिष्ट क्र.०६** मध्ये कळविल्याप्रमाणे अनुज्ञेय असणारे गुण कळविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

**सदर सवलत ही फक्त नियमित विद्यार्थ्यांनाच लागू राहील. खाजगी/बहिस्थ विद्यार्थ्यांना सवलत अनुज्ञेय असणार नाही. याची नोंद घ्यावी.**

**सदर सर्व सुधारीत परिशिष्ट व आवश्यक सर्व प्रमाणपत्रांसह परिपूर्ण असलेले खेळाडूंचे प्रस्ताव या कार्यालयाकडे दिनांक ३० एप्रिल २०२१ पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने सादर करावेत. तद्नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक
जिल्हा सातारा सांगली व कोल्हापूर.